**क्र.मु.मा.आ./नों.क्र. २०१७३१/२०/अ.क्र. ८७९/२३**

**अपिलार्थी, श्री. इक्बाल आर खान**

**सुनावणी दिनांक : १०.११.२०२३ (In continuation of order dt. 04.08.2023)**

दि. ०४.०८.२०२३ रोजीच्या सुनावणी वेळी अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी कोणतीही सुचना न देता अनुपस्थित होते. या कारणास्तव पुढील सुनावणी आज म्हणजेच दि. १०.११.२०२३ रोजी ठेवण्यात आली आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व प्रथम अपीलीय अधिकारी कोणतीही सूचना न देता अनुपस्थित आहेत. तर विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर असे निदर्शनास येत आहे की, या प्रकरणी अपीलार्थी यांनी पी/उत्तर विभागातील प्रभाग क्र. ३२ मध्ये विविध विकास कामासंबंधीची माहिती विचारलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे उत्तर दिले आहे. उत्तर अपीलार्थी यांना प्राप्त झाले आहे. तथापि, द्वितीय अपील अर्जात शुल्क भरण्याचे चलन प्राप्त झाले नाही असे नमूद करण्यात आले आहे.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. जन माहिती अधिकारी यांनी ७ दिवसामध्ये शुल्क भरण्यासंबंधीचे चलन अपीलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात यावे व शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात यावी.**

**२. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**मुंबई**
**दिनांक : २३.११.२०२३**

**(सुनील पोरवाल)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

